प्रेसनोट दिनांक २९/०८/२०२४

**श्री. निलेश सिताराम श्रावणे वनपाल, ठाणे वनविभाग, ठाणे, व श्री. मच्छिंद्र प्रकाश सोनटक्के, वनरक्षक, कोलशेत, ठाणे वनविभाग, ठाणे, यांना सापळा कारवाई करून लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतले.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
| स्टेशन डायरीनोंद क्र. | वर्तकनगर पोलीस स्टेशन स्टेशन डायरी नोंद क्र.३७/२०२५ वेळ १६ : ३६ वा. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. निलेश सिताराम श्रावणे वनपाल, ठाणे वनविभाग, ठाणे, वय ४७ वर्षे, रा. वर्धमाननगर, सी विंग, ब्लॉक नं. ३,४ वडवली सेक्शन, अंबरनाथ, पुर्व<br>२) श्री. मच्छिंद्र प्रकाश सोनटक्के, वनरक्षक, कोलशेत, वनविभाग, ठाणे वय २५ वर्षे, रा. रूम नं. १०५, बी विंग, कल्याणी बिल्डींग, जयमाता दी कॉम्प्लेक्स, कशेळी, ठाणे |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/—रूपये |
| तडजोडीअंती स्वीकारलेल्या लाचेची रक्कम | २५,०००/—रूपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार यांचा मोरपिस विक्री करण्याचा व्यवसाय आहे. दि. २५/०८/२०२५ रोजी तक्रारदार यांचे भावाला व ओळखीचे लोकांना मोरपिस विक्री करतांना लोकसेवक निलेश श्रावणे यांनी ताब्यात घेतले होते. त्याबाबत त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल न करणे करीता तसेच जप्त मोरपिस परत करणेकरीता लोकसेवक निलेश सिताराम श्रावणे हे ५०,०००/— रू. मागणी करीत असले बाबत दि. २६/०८/२०२५ रोजी तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २६/०८/२०२५ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक श्री. निलेश सिताराम श्रावणे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचेवर गुन्हा दाखल न करणेसाठी व ताब्यात घेतलेली मोरपीस परत करणेसाठी तडजोडीअंती२५,०००/— रू. स्विकारण्याची तयारी दर्शवुन सदरची रक्कम तक्रारदार यांना दि. २८/०८/२०२५ रोजी घेवुन येण्यास तसेच लोकसेवक मच्छिद्र सोनटक्के यांनी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. निलेश श्रावणे यांना लाचेची रक्कम देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.<br>त्याप्रमाणे दि. २८/०८/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. निलेश सिताराम श्रावणे, वनपाल, ठाणे वनविभाग, ठाणे,यांचे सांगणेवरून लोकसेवक मच्छिंद्र प्रकाश सोनटक्के, वनरक्षक, कोलशेत, वनविभाग, ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम २५,०००/— रूपये स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्यांचेविरूध्द वर्तकनगर पोलीस स्टेशन, ठाणे गु.र.नं.७०४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल असुन पुढील तपास सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी:—

१)मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे मो.नं. ८८७९२२६५५५

२)मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे मो. नं. ८४८४९९४५६९

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.


संपर्कपत्ता :—ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर ठाणे पश्चिम ४००६०१

सकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई—मेल :— spacbthane @mahapolice.gov.in

ऑनलाईनतक्रार अॅप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोलफ्रिनंबर :— १०६४

दुरध्वनीक्रमांक :—०२२—२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉट्सअॅपनं :— ९९३०९९७७००

(सचिन मोरे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.